खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – प्रा. वसंत हंकारे

प्रभात

# आईवडिलांच्या कष्टाचे पांग फेडा



## प्रा. वसंत हंकारे : राजगुरूनगरात 'बाप समजून घेताना'वर मार्गदर्शन

**राजगुरुनगर, दि. ३०(प्रतिनिधी)** - आई-वडील स्वतः हलकीचे जीवन जगून आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खस्ता खातात. त्यांना सर्व सोयीसुविधा देण्याचा अटोकाट प्रयत्न करतात. अशावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वागण्यातून आईवडिलांचा अभिमान होण्याचा प्रयत्न करावा. तसेच आई वडिलांच्या कष्टाचे पांग फेडा. असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बाप समजून घेताना या विषयावर बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा अॅड. राजमाला बुट्टेपाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


वसंत हंकारे म्हणाले की, आई-वडील आपल्यासाठी काय-काय करतात याचा म्हणजे मुलांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. मुलांनी आपल्या वडिलांना समजून घ्या. त्यांच्याशी बोला. आई-वडील संस्कारपीठ आहेत. त्यांचा आदर ठेवा. आई वडिलांचा विश्वासघात करू नका. त्यांच्यामुळे आपले अस्तित्व आहे. आपल्या वागण्याने त्यांची मान झुकेल असा व्यवहार करू नका असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांकडून गुणवंत होण्याबरोबर संस्कारक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली. मोबाइल ज्यांच्या पैशातून आपण विकत घेतो; त्यांचा फोटो स्क्रीनवर लावा. स्वाभिमान कधी विकू नका. स्वकर्तृत्वाने मोठे होण्याचे व्यसन अंगी बाणवा, शिक्षण संस्कारांनी मोठे व्हा, स्वतःला सिद्ध करा. असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शिल्पा टाकळकर यांनी, परिचय प्रा.मनीषा साबळे यांनी तर प्रणिता कोळेकर यांनी आभार मानले.

PuneDistrict, 31 Jan 2024, Page:016
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

# विद्यार्थ्यांनी पालकांचा अभिमान व्हावे : हंकारे



वसंत हंकारे

राजगुरुनगर, ता. १ : आई-वडील स्वतः हलाखीचे जीवन जगून आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खस्ता खातात. त्यांना सर्व सोयीसुविधा देण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. अशावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वागण्यातून आई-वडिलांचा अभिमान होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी येथे केले.ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बाप समजून घेताना' या विषयावर बोलत होते.

हंकारे पुढे म्हणाले, 'आई-वडील आपल्यासाठी काय-काय करतात याचा मुलांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. मुलांनी आपल्या वडिलांना समजून घ्या. त्यांच्याशी बोला. आई-वडील संस्कारपीठ आहेत. त्यांचा आदर ठेवा. आई वडिलांचा विश्वासघात करू नका. आपल्या वागण्याने त्यांची मान झुकेल असा व्यवहार करू नका. आईवडिलांच्या कष्टाचे पांग फेडा. स्वकर्तृत्वाने मोठे होण्याचे व्यसन अंगी बाणवा, शिक्षण संस्कारांनी मोठे व्हा, स्वतःला सिद्ध करा.' असे त्यांनी सांगितले. गुणवंत होण्याबरोबर संस्कारक्षम झाले पाहिजे. प्रबोधनाबरोबर परिवर्तन घडले तरच महापुरुषांच्या विचारांना न्याय मिळेल, असे ते म्हणाले. व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना डोक्यावर हात ठेवून डोळे बंद करायला लावले व आपल्या वडिलांना आठवून त्यांना अभिमान वाटेल अशी कामगिरी करण्याची शपथ दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले. परिचय प्रा. मनीषा साबळे यांनी करून दिला. आभार प्रणिता कोळेकर हिने मानले. .

Pune, District-Today
02/02/2024 Page No. 6

केसरी

## विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचा अभिमान व्हावे : प्रा. वसंत हंकारे



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** आई-वडील स्वतः हलाखीचे जीवन जगून आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खस्ता खातात. त्यांना सर्व सोयीसुविधा देण्याचा अटोकाट प्रयत्न करतात. अशावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वागण्यातून आई-वडिलांचा अभिमान होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बाप समजून घेताना ' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा राजमाला बुट्टेपाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकमत

# आई-वडिलांचा अभिमान विद्यार्थ्यांनी व्हावे : हंकारे

## साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : आई-वडील स्वतः हलकीचे जीवन जगून आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खस्ता खातात. अशावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वागण्यातून आईवडिलांचा अभिमान होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बाप समजून घेताना' या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसंत हंकारे पुढे बोलताना म्हणाले की, आई-वडील आपल्यासाठी काय-काय करतात याचा म्हणजे मुलांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. आई-वडिलांचा विश्वासघात करू नका. त्यांच्यामुळे आपले अस्तित्व आहे. आपल्या वागण्याने त्यांची मान झुकेल, असा व्यवहार करू नका, असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.



साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बाप समजून घेताना' या विषयावर बोलताना प्रा. हंकारे.

त्यांनी विद्यार्थ्यांकडून गुणवंत होण्याबरोबर संस्कारक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली. आई-वडिलांच्या कष्टाचे पांग फेडा. मोबाइल ज्यांच्या पैशातून आपण विकत घेतो; त्यांचा फोटो स्क्रीनवर लावा. स्वाभिमान कधी विकू नका.

स्वकर्तृत्वाने मोठे होण्याचे व्यसन अंगी बाणवा, शिक्षण संस्कारांनी मोठे व्हा, स्वतःला सिद्ध करा, असे त्यांनी सांगितले. प्रबोधनाबरोबर परिवर्तन घडले तरच महापुरुषांच्या विचारांना न्याय मिळेल, असे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी, परिचय प्रा. मनीषा साबळे यांनी तर आभार प्रणिता कोळेकर हिने मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Feb 01, 2024
Powered by: erelego.com

# विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचा अभिमान व्हावे : वसंत हंकारे

समर्थ भारत वृत्तसेवा





**राजगुरुनगर ता. ३० :** आई-वडील स्वतः हलकीचे जीवन जगून आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खस्ता खातात. त्यांना सर्व सोयीसुविधा देण्याचा अटोकाट प्रयत्न करतात. अशावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वागण्यातून आईवडिलांचा अभिमान होण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बाप समजून घेताना या विषयावर बोलत होते. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर,राजेंद्र टाकळकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> आई-वडील आपल्यासाठी काय-काय करतात याचा म्हणजे मुलांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. मुलांनी आपल्या वडिलांना समजून घ्या. त्यांच्याशी बोला. आई-वडील संस्कारपीठ आहेत. त्यांचा आदर ठेवा. आई वडिलांचा विश्वासघात करू नका. त्यांच्यामुळे आपले अस्तित्व आहे. आपल्या वागण्याने त्यांची मान झुकेल असा व्यवहार करू नका.
>
> **- वसंत हंकारे**

विद्यार्थ्यांकडून गुणवंत होण्याबरोबर संस्कारक्षम होण्याची अपेक्षा वसंत हंकारे यांनी व्यक्त केली. आई वडिलांच्या कष्टाचे पांग फेडा. मोबाईल ज्यांच्या पैशातून आपण विकत घेतो; त्यांचा फोटो स्क्रीनवर लावा. स्वाभिमान कधी विकू नका. स्वकर्तृत्वाने मोठे होण्याचे व्यसन अंगी बाणवा, शिक्षण संस्कारांनी मोठे व्हा, स्वतःला सिद्ध करा. असे त्यांनी सांगितले. प्रबोधनाबरोबर परिवर्तन घडले तरच महापुरुषांच्या विचारांना न्याय मिळेल असे सांगितले.

व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना डोक्यावर हात ठेवून डोळे बंद करायला लावले व आपल्या वडिलांना आठवून त्यांना अभिमान वाटेल अशी कामगिरी करण्याची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी, परिचय प्रा. मनीषा साबळे यांनी केले तर आभार प्रणिता कोळेकर हिने मानले.

HRN

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**